# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**१४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि१६.०४.२०२४**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०९/०४/२०२४ ते १५/०४/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१७/०४/२०२४ ते २१/०४/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ३ | ० | ० | २ | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ४१ | ४० | ३९ | ४० | ४० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २६ | २७ | २७ | २६ | २६ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | २ | ३ | ५ | २ | ४ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५६ | ६० | ६१ | ६२ | ५६ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १७ | १३ | १७ | १५ | १७ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १२ | १७ | १८ | १९ | २० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशता ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच किमान तापमानात २ ते ३ अंश से.ने वाढ होण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | मातीतील ओलावा वाचवण्यासाठी अच्छादनाचा वापर करावा , त्याकरीता गवताचा/ पिकाचे अवशेष/ पॉलिथीनचा उपयोग करावा.<br>कामगारानी थेट सूर्यप्रकाशात कामाचे टाळावे.<br>तापमानात होत असलेल्या वाढीमुळे उभ्या पिकांना पाण्याचा ताण बसणार नाही या ची दक्षता घ्यावी त्याकरीता पिकांना आवश्यकतेनुसार हलके सिंचन द्यावे.<br>गंभीर वाढीच्या टप्प्यावर सिंचनाची वारंवारता वाढवावी.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल अॅपचा वापर करावा. |
| संदेश | | किमान तापमानात २ ते ३ अंश से.ने वाढ होण्याची शक्यता आहे. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा पोसण्याची अवस्था | भुईमुग पिकास शेंगा पोसण्याच्या अवस्थेत (६५ ते ७० दिवस) पाण्याचा ताण पडू देऊ नये. या अवस्थेत संरक्षित पाण्याची पाळी गरजेप्रमाणे द्यावी.<br>भुईमुग पिकात काही ठिकाणी पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पिकावर क्लोरोपायरीफॉस २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून निरभ्र वातावरणात फवारणी करावी. |
| बाजरी | दाणे भरणे | पेरणीनंतर ६० आणि ६५ दिवसांनी पिकावर डीएपी (१८:४६:००) किंवा १९:१९:१९ या विद्राव्य खताच्या २ % द्रावणाची २० ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे हवामान कोरडे असताना फवारणी करावी.<br>बाजरी पिकावरील सोसे/हिंगे या किडीच्या नियंत्रणासाठी वारा शांत असताना कणसांवर मिथिल पॅराथिऑन (२%) ८ किलो प्रति एकरी धुरळणी करावी. (पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता ०८ मे २०२३ नंतर किंवा स्वच्छ हवामान दरम्यानच सदरील कामे करावीत). |
| भाजीपाला पिके | | नुकत्याच लागवड झालेल्या रोपाना सावली करण्याची व्यवस्था करावी.<br>गरम वार्यािला अडथळा निर्माण होण्याकरीता शेताच्या कडेलाबांदावर व्यवस्था करावी. |
| फळ पिके | | नविन लागवड केलेल्या फळाबागांच्या कलमी रोपांचे उन्हापासून संरक्षण करावे. तसेच ठिबकव्दारे पाणी द्यावे. |
| पशुसंवर्धन | | जनावरांना सावलीत ठेवावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे.<br>जनावरांकडून सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान काम करू घेवु नये.<br>हिरवे गवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे.<br>जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे.<br>तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झा कावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्या वा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |
| कुक्कुटपालन | | पोल्ट्री हाऊसमध्ये पडदे लावावेत आणि हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९

ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.

दि. : १६.०४.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**